दि.14.08.2024.

<u>प्रेसनोट</u>

## गुरनं. 01/2024 भादंवि कलम 406, 420, 34 सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम 43-अ, 66 मध्ये फसवणुक झालेली 3,99,000/- रु. फिर्यादीस परत.

****************

फिर्यादी प्रा.नंदकुमार राठी, रा. समर्थनगर, छत्रपती संभाजीनगर यांचे अंगावरील पांढरे डागावर इलाज करतो असे सांगुन मोबाईल नंबर घेवून बनावट नावाने ओळख सांगुन, खान डॉक्टर पुर्ण इलाज करतो असे कळविले. फिर्यादीचे घरी जाऊन अंगावर सुया टोचून त्यातुन पांढराद्रव बाहेर काढून दाखवून त्याची फिस म्हणुन 3,99,000/- रुपये बँकेत जमा करण्याचे सांगीतले. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी बँकेतुन ऑनलाईन पद्धतीने पाठविले परंतु त्यानंतर पांढरे डाग न गेल्याने आयुर्वेदीक औषधी खरेदी करण्यास भाग पाडले. तरी देखील पांढरे डाग गेले नाही या करिता डॉ.खान यास फिर्यादीने संपर्क केला असता त्यांचे कडुन उडवा उडवीचे उत्तरे मिळल्याने फिर्यादी यांना त्यांचे सोबत फसवणुक झाले बाबत समजले, म्हणुन सायबर पोलीस ठाणे, येथे फिर्यादी नंदकुमार राठी यांचे फिर्यादीवरुन गुरनं. 01/2024 भादंवि कलम 406, 420, 34 सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम 43-अ, 66 प्रमाणे दि.09/01/2024 रोजी दाखल आहे.

सदर गुन्ह्यात सापळ रचुन आरोपी राजा शेक मेहमुद शेक, मोहम्मद रंजीत मोहम्मद सलीम यांना अटक करण्यात आली. त्यानंतर अटक आरोपी यांचेकडुन त्याचे साथीदार बाबत माहिती घेवुन त्याचे साथीदार मोहम्मद नासेर आणि असलम पिता शेख मुबारिक यांना धुळे पोलीसांच्या मदतीने ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्ह्यासंबंधाने तपास करुन फिर्यादी यांची फसवणुक झालेली रक्कम 3,99,000/- रुपये जप्त करण्यात आले. मा.न्यायालयाचे आदेशाने फिर्यादी नंदकुमार राठी यांची फसवणुक झालेली रक्कम श्री.प्रवीण पवार साहेब मा.पोलीस आयुक्त यांचे हस्ते परत करण्यात आली. फिर्यादी यांनी पोलीसांचे मनापासुन आभार मानले.

सदरची कामगिरी श्री.प्रविण पवार मा.पोलीस आयुक्त, श्री.प्रशांत स्वामी पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री.धनंजय पाटिल सहा.पोलीस आयुक्त(गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.गजानन कल्याणकर पोलीस निरीक्षक, श्री.कैलास अन्नलदास पोलीस उप निरीक्षक, पोह/428 तळवंदे, 580 शेळके,पोअं/3032 सोनटक्के,2235 कदम,2351 उगले,2655 काळे, 2477 पाटिल, 1038 चौधरी, 163 कुऱ्हाडे यांनी केली.

( गजानन कल्याणकर )
पोलीस निरीक्षक,
पोलीस ठाणे सायबर, छत्रपती संभाजीनगर
शहर.